26 NOV 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मॉडेल्स निर्माण करण्याचा अभिनव उपक्रम

## प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील; डॉ. गुरव, डॉ. मोवाली यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

**सकाळ वृत्तसेवा**

टेंबलाईवाडी, ता. २५ : विविध संशोधन समस्यांच्या अनुषंगाने प्रभावी उपाययोजना सुचविणारी प्रतिमाने (Models)निर्माण करण्याचा उपक्रम अभिनव असून, तो पुस्तकरूपाने सादर होतो, ही अभिमानाची बाब आहे, असे प्रतिपादन प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी आज येथे केले.



**टेंबलाईवाडी : शिवाजी विद्यापीठात डॉ. ए. एम. गुरव, डॉ. लिटॉन मोवाली यांच्या पुस्तकाचे प्रकाशन करताना प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील. शेजारी एम. जे. पाटील, अतुल एतावडेकर, महेश चव्हाण, डॉ. मोवाली, डॉ. एम. एस. देशमुख, डॉ. गुरव, डॉ. पी. डी. राऊत.**

शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागातील डॉ. ए. एम. गुरव व त्यांचे विद्यार्थी डॉ. लिटॉन प्रोसाद मोवाली (बांग्लादेश) यांनी संयुक्तपणे लिहिलेल्या'रिसर्च, रिइनव्हेंट अँड रिसॉल्व्ह:मॉडेल्स फॉर इफेक्टिव्ह सोल्युशन्स'पुस्तकाच्या प्रकाशनप्रसंगी ते बोलत होते.

डॉ. पाटील म्हणाले, ''डॉ. गुरव व डॉ. मोवाली यांनी विविध संशोधन समस्यांवरील उपायांची प्रतिमाने पुस्तकाद्वारे सादर केली आहेत. ही प्रतिमाने अन्य संशोधन समस्यांवरही उपयुक्त व मार्गदर्शक स्वरुपाची ठरतील.'' डॉ. मोवाली विद्यापीठातील पीएच. डी. अभ्यासक्रम पूर्ण करून त्यांच्या मायदेशी बांग्लादेशला रवाना होत आहेत. त्यांना डॉ. पाटील यांनी शुभेच्छा दिल्या. डॉ. गुरव यांनी पुस्तकाच्या संकल्पनेविषयी माहिती दिली. उसाची विविध उत्पादने, कचरा व सांडपाणी व्यवस्थापन, गूळ प्रक्रिया व इतर अन्न प्रक्रियां यांसह तणाव व्यवस्थापनासह विविध प्रतिमानांचा यामध्ये समावेश असल्याची माहितीही त्यांनी दिली. ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ डॉ. पी. डी. राऊत, आयक्यूएसीचे संचालक डॉ. एम. एस. देशमुख,महेश चव्हाण, अतुल एतावडेकर, एम. जे. पाटील उपस्थित होते.

26 NOV 2021

जनसंपर्क कक्ष
लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दोन डोस नंतरच युवा महोत्सवात प्रवेश

## शिवाजी विद्यापीठाचा निर्णय : २० डिसेंबरपासून जिल्हास्तरीय आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्याने शिवाजी विद्यापीठाने जिल्हास्तरीय आणि मध्यवर्ती युवा महोत्सव दि. २० ते २९ डिसेंबरदरम्यान ऑफलाइन पद्धतीने घेण्याचे ठरविले आहे. मात्र, दोन डोस घेतलेल्या विद्यार्थी कलाकारांना या महोत्सवात सहभागी होता येणार आहे. कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यात महोत्सव रंगणार आहे.

जिल्हास्तरीय महोत्सवाची सुरुवात दि. २० डिसेंबर रोजी सातारा येथील छत्रपती शिवाजी महाविद्यालयातून होईल. सांगली येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात दि. २३ डिसेंबर रोजी, तर कोल्हापुरातील न्यू कॉलेजमध्ये दि. २४ डिसेंबरला महोत्सव होणार आहे. मध्यवर्ती युवा महोत्सवाच्या संयोजनाची संधी यावर्षी कोल्हापूर जिल्ह्याला मिळाली आहे. महागाव (ता. गडहिंग्लज) येथील संत गजानन महाराज अभियांत्रिकी महाविद्यालयात दि. २७ ते २९ डिसेंबर या कालावधीत मध्यवर्ती युवा महोत्सव रंगणार आहे. कोरोना लसीचे दोन डोस घेतलेल्यांना युवा महोत्सवात सहभागी होता येईल, अशी माहिती विद्यापीठ विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी दिली.

### सुमारे दोन हजार विद्यार्थ्यांचा सहभाग

जिल्हास्तरीय महोत्सव विविध १४, तर मध्यवर्ती महोत्सव ३४ कलाप्रकारांमध्ये होणार आहे. या दोन्ही युवा महोत्सवामध्ये सुमारे दोन हजार विद्यार्थी कलाकार सहभागी होण्याची शक्यता आहे.

पुढारी

# विद्यापीठाच्या डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजीतील ११५ विद्यार्थ्यांची निवड

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजीतील (डीओटी) ११५ विद्यार्थ्यांची विविध कंपन्यांत निवड झाली आहे. डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजीच्या अभियांत्रिकी शाखेत वेगवेगळ्या अभ्यासक्रम राबवित विद्यार्थीकेंद्रित शिक्षणावर भर दिला जातो. कोरोना संकटामुळे निर्माण झालेल्या मर्यादांवर मात करून टेक्नॉलॉजी विभागाच्या विद्यार्थ्यांनी प्लेसमेंटमध्ये भरारी घेतली आहे. विभागातील विद्यार्थ्यांची वेगवेगळ्या आंतरराष्ट्रीय कंपन्यांत निवड झाली आहे. यात सॉफ्टवेअरबरोबरच टेलिकम्युनिकेशन, एम्बईडेड सिस्टीम्स, नेटवर्किंगमधील नोकऱ्यांचा अंतर्भाव आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजीचे संचालक प्रा. डॉ. आर. के. कामत, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर डॉ. एस. बी. सादळे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात 'इनोव्हेशन मीट' उत्साहात

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

नवोन्मेष उपक्रमाला प्रोत्साहन हा विद्यापीठाला समाजाशी अधिक दृढपणे जोडण्याचा महत्त्वाचा प्रयत्न आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. महाराष्ट्र राज्य नवोन्मेष संस्था, शिवाजी विद्यापीठ संशोधन व विकास फाऊंडेशन, इनक्युबेशन व लिंकेजिस केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या 'इनोव्हेशन मीट'च्या उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, सर्वसामान्य नागरिक, छोटे उद्योजक, व्यावसायिक आणि विद्यार्थी यांच्याकडे अनेक नवसंकल्पना असतात. मात्र, त्या कशा प्रत्यक्षात आणायच्या याबाबत संभ्रम असतो. सुप्त नवसंकल्पनांना व्यासपीठ देण्याच्या हेतूने विद्यापीठाने नवोन्मेषाला प्रोत्साहन देण्याचे धोरण स्वीकारले आहे. याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक इनोव्हेशन केंद्राचे संचालक डॉ. एम. एस. देशमुख यांनी केले. पर्यावरण अधिविभागाच्या प्रमुख डॉ. आसावरी जाधव यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. पी. डी. राऊत यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
26 NOV 2021 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजीच्या ११५ विद्यार्थ्यांची निवड

**सकाळ वृत्तसेवा**

टेंबलाईवाडी, ता. २५ : शिवाजी विद्यापीठाच्या डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजीमधील ११५ विद्यार्थ्यांची विविध कंपन्यांत निवड झाली. यात टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस, कॉग्निझंट टेक्नॉलॉजिस, अँमडॉकस, कॅपजेमिनी, इन्फोसिस, एम्प्सिस, आटोस ग्लोबल, डी. एक्स. सी. टेक्नॉलॉजिएस, माईंड ट्री, म्युसिग्मा, थिंकक्लाऊड, पुणे, एक्सफॉ, नवीन सिस्टिम्स प्रायव्हेट लिमिटेड, असेंचूर, मौरी टेक, हेक्सावर, स्पेरिडिअन, वॉल्स्टर, टाटा एलॅक्सि या नामांकित आंतरराष्ट्रीय कंपन्याचा



समावेश आहे. सॉफ्टवेअरबरोबरच टेलिकम्युनिकेशन, एम्बईद्देड सिस्टिम्स, नेटवर्किंगमधील नोकऱ्यांचा यात अंतर्भाव आहे.

डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजीत अभियांत्रिकीमधील वेगवेगळे अभ्यासक्रम राबविले जातात. कोरोनाच्या संकटामुळे निर्माण झालेल्या मर्यादांवर मात करून टेक्नॉलॉजी विभागाच्या विद्यार्थ्यांनी प्लेसमेंटमध्ये भरारी घेतली आहे.

उर्वरित विद्यार्थ्यांना मुलाखतीच्या अजून संधी मिळणार आहे, असे डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजीचे संचालक प्रा. डॉ. आर. के. कामत यांनी सांगितले. त्यांना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे मार्गदर्शन, तर प्रा. डॉ. कामत , ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर डॉ. एस. बी. सादळे यांचे प्रोत्साहन मिळाले.

26 NOV 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संविधान अभ्यासक्रमाला वाढता प्रतिसाद

## डॉ. आंबेडकर संशोधन व विकास केंद्रात सुविधा; तिसऱ्या बॅचसाठी प्रवेश

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २५ : शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास विकास केंद्रामार्फत दोन वर्षापूर्वी सुरू झालेल्या 'सर्टिफिकेट कोर्स इन इंडियन कॉन्स्टिट्यूशन'' या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाला प्रतिसाद वाढत आहे. यंदा तिसऱ्या बॅचसाठी प्रवेश सुरू झाले असून तीस नोव्हेंबरपर्यंत इच्छुकांना अर्ज सादर करता येणार आहेत.

सहा महिने कालावधीचा हा अभ्यासक्रम असून दहावी उत्तीर्ण व्यक्तीला प्रवेश घेता येतो. संविधानाची मूलभूत ओळख व अभ्यास करता यावा, या उद्देशाने हा अभ्यासक्रम सुरू झाला. पहिल्या वर्षी प्रवेश प्रक्रिया सुरू होताच काही दिवसातच प्रवेश संपले. गेल्या वर्षी कोरोनामुळे कमी प्रतिसाद मिळाला. मात्र, यंदा या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्यांची संख्या वाढत आहे. पहिल्या पन्नास जणांनाच प्रवेश दिला जाणार आहे. भारतीय संविधानाची ऐतिहासिक पार्श्वभूमी, भविष्यातील महत्त्व, भारतीय संसदीय लोकशाही, संविधानातील विशेष तरतुदी अशा चार प्रमुख विषयांवर आधारित हा अभ्यासक्रम आहे.

केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी माहिती देताना सांगितले, ''दोन वर्षांपूर्वी सुरू झालेल्या अभ्यासक्रमाला यंदाही चांगला प्रतिसाद आहे. याशिवाय 'पी.जी.डिप्लोमा इन डॉ. बी. आर. आंबेडकर थॉट' हा अभ्यासक्रमही शिकवला जातो. त्याचा कालावधी एक वर्षे असून कोणत्याही शाखेची पदवी उत्तीर्ण आवश्यक आहे. त्याचीही प्रवेश प्रक्रिया सुरू आहे.''

### संविधान दिन का?

संविधान सभेने घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडून २६ नोव्हेंबर १९४९ रोजी अंतिम मसुदा स्वीकारला. त्यामुळे हा दिवस संविधान दिन म्हणून सर्वत्र विविध उपक्रमांनी साजरा केला जातो. उद्या (शुक्रवारी) होणाऱ्या संविधान दिनानिमित्तही शहर आणि जिल्ह्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे.

» संविधान दिन विशेष...

# भेट दिल्या संविधानाच्या हजारो प्रती

## प्रा. नामदेव मधाळेंचा उपक्रम; सत्कार, वाढदिवस, लग्नातही प्रबोधन

रमजान कराडे : सकाळ वृत्तसेवा

नानीबाई चिखली, ता. २५ : कोणताही सत्कार असो, लग्न, बारसे, वाढदिवस समारंभ असो वा दहावी, बारावीत नंबर मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव असो, तिथे भारतीय संविधानाचे महत्त्व समजावे या उद्देशाने प्रा. नामदेव मधाळे हे सहा वर्षांपासून संविधानाच्या प्रती भेट देत आहेत. संविधान उद्देशिका आणि प्रसंगी संपूर्ण संविधानाच्या आवृत्तीच्या आत्तापर्यंत हजारो प्रती त्यांनी दिल्या आहेत. समाजकार्य म्हणून प्रा. मधाळे यांनी चालवलेला हा उपक्रम वेगळाच ठरला आहे.


नामदेव मधाळे

अर्जुननगर (ता. कागल) येथील देवचंद कॉलेजमध्ये कनिष्ठ विभागात ते राज्यशास्त्राचे प्राध्यापक आहेत. वीस वर्षे राज्यशास्त्र शिकवित असताना त्यांनी या उपक्रमातून नवीन ओळख निर्माण केली आहे. आज संविधान दिन साजरा होत असताना त्यांचा हा उपक्रम समाजासाठी निश्चितच दिशादर्शक ठरत आहे.

> **संविधानाच्या मूल्यांची फक्त ओळख होऊन चालणार नाही तर, त्यांचा प्रसार आणि प्रचार समाजातील सर्व स्तरातील घटकांपर्यंत झाला पाहिजे. आपल्यासाठी संविधान किती महत्त्वाचे आहे, याची जाणीव सर्वांना झाली पाहिजे. यासाठी माझ्याकडून हा छोटासा प्रयत्न आहे.**
> **- प्रा. नामदेव मधाळे, देवचंद कॉलेज**

संविधानाची उद्देशिका म्हणजे संविधानाची गुरुकिल्ली होय. संविधान म्हणजे काय, संविधानाची वैशिष्ट्ये, उगमस्थाने, उद्देशिकेतील नक्षीचा अर्थ यासारख्या असंख्य प्रश्नांची जाण युवकांत निर्माण व्हावी. संविधानामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे न्याय, सामाजिक, आर्थिक व राजनैतिक स्वातंत्र्य विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना, समानता दर्जा आणि संधी आदी गोष्टी अधिक स्पष्ट व्हाव्यात, यासाठी प्रा. मधाळे हा उपक्रम राबवित आहेत. हजारो प्रती दिल्यानंतरही या उपक्रमाचा गाजावाजा न करता काम सुरू ठेवण्याची त्यांची पद्धत अनुकरणीय आहे.

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठाच्या ११५ विद्यार्थ्यांची निवड

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या डिपार्टमेंट ऑफ टेकनॉलॉजीमधील ११५ विद्यार्थ्यांची विविध आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये निवड झाली आहे. यामध्ये टाटा कन्सल्टन्सी सर्विसेस, कॉग्निझंट टेकनॉलॉजिस, अँम्मडॉकस, कॅपजेमिनी, इन्फोसिस, एम्फिसस, आटोस ग्लोबल, डी. एक्स. सी. टेक्नॉलॉजिएस, माईंड ट्री, म्युसिग्मा, थिंकक्लाऊड पुणे, एक्सफॉ, नवीन सिस्टिम्स प्रायव्हेट ली., असेंचुर, मौरी टेक, हेक्सावर, स्पेरिडिअन, वॉल्स्टर, टाटा एलॅक्सि या सारख्या नामांकित आंतरराष्ट्रीय कंपन्यांचा समावेश आहे. अनेक विद्यार्थ्यांनी कंपन्यांच्या मुलाखतीमध्ये यश मिळवले आहे.

या सर्व विद्यार्थ्यांना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदींचे मार्गदर्शन लाभले. डिपार्टमेंट ऑफ टेकनॉलॉजीचे संचालक प्रा. डॉ. आर. के. कामत, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर डॉ. एस. बी. सादळे, विभागातील संमन्वयक, टी. पी. ओ. आणि सर्व प्राध्यापक वर्ग यांनी विद्यार्थ्यांच्या निवडीसाटी परिश्रम घेतले. यशस्वी विद्यार्थ्यांचे विभागातर्फे अभिनंदन केले.

तरुण भारत



कसबा बीड : शिवाजी विद्यापीठ क्रीडा विभाग पी. टी. गायकवाड, प्रा. श्रीपाल गद्रे, बाजीराव पाटील, खेळाडू मानतेश पाटील.

# म. ह. शिंदे महाविद्यालय कलर ॲवार्डने सन्मानित

प्रतिनिधी
कसबा बीड -

अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कुस्ती स्पर्धा हिस्सार हरियाणा १९ -२० कलर्स ॲवार्ड शिवाजी विद्यापीठतर्फे म. ह. शिंदे महाविद्यालय तिसंगी कॉलेजला सन्मानित करण्यात आले. महाविद्यालय तिसंगीचे खेळाडू मानतेश मुरलीधर पाटील ग्रीको-रोमन ब्रांज मेडल, रोहन रँडी शिवराज महाविद्यालय गडहिंग्लज रौप्यपदक, अक्षय मंगवडे श्रीपतराव चौगुले महाविद्यालय, कोतोली ब्राँझ मेडल, या खेळाडूंनी विजयी पदके मिळवली. या संघाचे तीन मॅनेजर प्राध्यापक बाजीराव पाटील यांना कलर्स अवार्डने सन्मानित करण्यात आले. बाजीराव पाटील यांनी संघासाठी खूप मोलाचे योगदान दिले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थी विविध खेळामध्ये अव्वल होऊन चांगल्या ठिकाणी आपली कामगिरी करत आहेत. त्यांच्या या कार्यासाठी म. ह. शिंदे कॉलेजचे संस्थापक अध्यक्ष पी. जी. शिंदे, सचिव स्वप्नील शिंदे, प्राचार्य एन. के. शिंदे यांचे सहकार्य मिळाले.